**२४ दिव्यांग बांधवांना दिव्यांग प्रमाणपत्र** ५० बेडपर्यंतच्या रुग्णालयात उपलब्ध होणार.

**२५ महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत समाविष्ट खासगी रुग्णालयासाठी** मोबाईल ॲप व २४ तास हेल्पलाईन उपलब्ध करणार.

**२६ ग्रीन एनर्जी कार्यक्रमांतर्गत राज्यातील** सरकारी रुग्णालयातील इलेक्ट्रिक बिल खर्च १३०० कोटी वरून जास्तीत जास्त कमी करणार.



**२७ e-Sushrut (HMIS System)** संकेतस्थळाचे विस्तारीकरण.

**२८ महाराष्ट्र शुश्रुषागृह नोंदणी प्रणालीचे** (Bombay Nursing Home Act) ऑनलाईन पद्धतीने प्रमाणपत्र वितरण.





**२९ राज्यातील ५ जिल्ह्यांत ६ आरोग्य संस्थांमध्ये** डायलिसीस युनिटला सुरुवात.

**३० राज्यातील आरोग्य संस्थांच्या बांधकामाच्या** ऑनलाईन सनियंत्रण व पाठपुरावा सॉफ्टवेअर.



**३१ गर्भाशयमुख कर्करोग जनजागृती** (९ ते १४ वर्षे वयोगट) अभियान.

**३२ महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी रुग्णालयांमध्ये** महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा शुभारंभ व सर्वांसाठी खुले.

**३३ आरोग्य संस्था निरीक्षण प्रणालीची सुरुवात.**

**३४ कर्करोग मोबाईल व्हॅन - ८, ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका - ७, १०२ रुग्णवाहिका - ३८४, सीटी स्कॅन - २, डिजिटल हँड हेल्ड एक्स-रे मशिन - ८०, डे केअर किमोथेरपी सेंटर - ६ यांचे लोकार्पण.**



**३५ राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचा** शासन सेवेत समावेशन करणे तसेच त्यांचे मानधन वाढीचा प्रस्ताव लवकर सादर करण्याबाबत निर्देश.

**३६ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदली प्रक्रियेमध्ये पारदर्शीपणा** असावा यासाठी आठ वर्षापेक्षा जास्त सेवा झालेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या समुपदेशनाने करण्यात येणार. त्यानंतर विनंती बदल्या होणार.



**३७ बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट व इतर कायद्यामध्ये सुधारणा** करण्यासाठी लीगल फर्मची नियुक्ती करण्यात येणार.

**३८ समुदाय वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या** समुपदेशनाद्वारे करणार.

**३९ राज्यातील प्रत्येक गरजू रुग्णाला वेळेवर रक्त मिळावे,** तुटवडा होऊ नये आणि अतिरिक्त रक्त वाया जाऊ नये यासाठी 'नो शॉर्टेज, नो वेस्टेज' धोरण राबविणार.

**४०** सर्व सरकारी व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेशी संलग्न रुग्णालयांमध्ये **अपघातग्रस्त रुग्णासाठी १ लाख रुपयांपर्यंत 'कॅशलेस' उपचार.**


आम्ही सेवेकरी पाऊलांचे

|| भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ||

चरण सेवा

**महाआरोग्य योजना पुस्तिका डाऊनलोड करण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा**

# सार्वजनिक आरोग्य विभाग व मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष




## || आरोग्याची वारी पंढरीच्या दारी ||

## || भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची ||



देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

प्रकाश आबिटकर
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

मेघना साकोरे - बोर्डीकर
राज्य मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

# आरोग्याचा ध्यास, महाराष्ट्राचा विकास



**मा. प्रकाश आबिटकर,**
मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र

## आरोग्य विभागाची कामगिरी

सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कुशल नेतृत्वाखाली राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. प्रकाश आबिटकर आणि मा. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर आरोग्य विभागाचे कार्य अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, गतिमान व राज्याला सुदृढ व संपन्न बनविण्यासाठी आरोग्य सेवेला प्राधान्य देत आहेत.

सुदृढ महाराष्ट्र, आरोग्य संपन्न महाराष्ट्र आणि आरोग्याचा ध्यास, महाराष्ट्राचा विकास या ध्येयाने मा. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर आणि मा. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी आरोग्य विभागाचा संपूर्ण सहभाग निश्चित करून विभागाला पहिल्या क्रमांकावर पोहोचविण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करून त्या प्रामाणिकपणे पार पाडण्याच्या स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अभ्यासपूर्ण सूचनांमुळे आणि त्यांनी घेतलेल्या सामाजिक दायित्व भूमिकेमुळे आरोग्य यंत्रणेच्या कामकाजाला नवी दिशा व गती मिळाली आहे. आरोग्य मंत्र्यांच्या नेतृत्वात सार्वजनिक आरोग्य विभागाने अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत.

## सार्वजनिक आरोग्य विभागाचे महत्त्वाचे निर्णय

**१ राज्य आरोग्य धोरण व आरोग्य पर्यटन संकल्पना**
सार्वजनिक आरोग्य विभागाची आरोग्य व्यवस्था अधिक बळकट व लोकाभिमुख करणारे महाराष्ट्राचे स्वतंत्र 'राज्य आरोग्य धोरण' व 'आरोग्य पर्यटन' ही संकल्पना रुजवण्याच्या दृष्टीने निर्णय.



**२ रिक्त पदांची त्वरित भरती**
राज्यातील आरोग्य सेवा बळकट आणि सक्षम करण्यासाठी विभागातील रिक्त पदे व प्रतीक्षा यादीवरील पदे तात्काळ भरणार. यामुळे प्रशासकीय कामात गती येणार.

**३ वर्ग - १ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पद भरती**
आरोग्य सेवेतील वर्ग - १ वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यास प्राधान्य.

**४ राज्यभरात खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम**
राज्यातील खासगी रुग्णालयांकडून नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम.

**५ संसर्गजन्य आजार कायद्याची अंमलबजावणी**
संसर्गजन्य आणि साथीचे रोग नियंत्रणात राहावे यासाठी साथरोग कायद्याची कठोर अंमलबजावणी.



**६ राज्यस्तरीय कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम**
कर्करोगाविषयी व्यापक जनजागृती, तपासणी, निदान आणि उपचार करण्यासाठी राज्यस्तरीय कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहीम व तपासणीसाठी मोबाईल व्हॅनचे लोकार्पण व मोहीम.

**७ गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याची (पीसीपीएनडीटी) कठोर अंमलबजावणी**
स्त्री भ्रूण हत्या टाळून लिंग गुणोत्तराच्या प्रमाणातील दरी कमी करण्यासाठी 'पीसीपीएनडीटी' कायद्याची प्रभावी अंमलबजावणी.



**८ रुग्णालयांना अचानक भेटी**
रुग्णालयांतील सोयी-सुविधा सुधारण्यासाठी महिन्यातून किमान दोन वेळा रुग्णालयांना भेटी.

**९ अत्यावश्यक व गरजेच्या औषधांचा नियमित पुरवठा**
ससर्व सरकारी रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक व गरजेच्या दर्जेदार औषधांचा पुरवठा.

**१० मानवी अवयव प्रत्यारोपण**
मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यात सुधारणा करण्यासाठी पुढाकार.

**११ बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना सक्षम करणार**
अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने मदत मिळावी यासाठी सरकारी रुग्णालयांमध्ये बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना अधिक सक्षम करणार.

**१२ रुग्णालय दत्तक योजना**
वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत त्यांच्या प्रथम नियुक्तीची आरोग्य संस्था दत्तक घेण्याची योजना.

**१३ औषधे व उपकरणे मानक कार्यप्रणाली (एसओपी)**
औषधे व उपकरणे मानक कार्यप्रणाली (एसओपी) धोरण सक्षम करणार.

**१४ ब्लड बँकेवर सनियंत्रणासाठी टास्क फोर्स**
राज्य रक्त संक्रमण परिषद मार्फत खासगी व शासकीय ब्लड बँक यांच्यावर सनियंत्रण करण्यासाठी विशेष टास्क फोर्स.

**१५ ५०% बांधकाम पूर्ण झाल्यावर पद निर्मिती**
रुग्णालयांचे बांधकाम ५० टक्के पूर्ण झाल्यानंतर पद निर्मिती करणार.

**१६ मानसिक रुग्णालय**
निम्हांसच्या धर्तीवर मनोरुग्णालयात सेवा विकसित करणार.

**१७ बृहन्मुंबई महानगरपालिकेसह सर्व महानगरपालिकांच्या रुग्णालयामध्ये**
महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा समावेश.

**१८ राज्यातील सर्व नागरिकांचे आयुष्मान भारत कार्ड काढून**
पाच लाखापर्यंत मोफत उपचार करून देणार.

**१९ राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयातील उत्कृष्ट सेवा बजावणारे**
१९. वैद्यकीय अधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच जास्तीत जास्त नॉर्मल प्रसूती करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा सत्कार.

**२० लॅब ॲक्टची स्थापना करून राज्यातील सर्व खासगी लॅबमधून**
नागरिकांना योग्य चाचणी होण्यासाठी स्वतंत्र आस्थापना करून सर्व खासगी लॅबोरेटरी राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली आणणार.

**२१ देशातील सर्वोत्कृष्ट सेवा देण्यासाठी १०८ रुग्णवाहिकेची** दर्जेदार सेवा उपलब्ध.

**२२ आवश्यक त्या ठिकाणी तत्काळ ब्लड उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणा उभारणार**
खासगी व सरकारी ब्लड बँकेवरील नियंत्रण प्रभावी करण्यासाठी वेगळी यंत्रणा निर्माण करणार.

**२३ आर.बी.एस.के. अंतर्गत राज्यातील सर्व शाळांमधील**
मुलांची तपासणी / निदान व गरजेनुसार मोफत उपचार मोहीम.